महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

क्रमांकः प्रतिनि २०१७/(प्र.क्र.१३६/२०१७)/का.१४

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

तारीख: ०९ .०१.२०१८

आदेश

श्री. निवृत्ती भागुजी मराळे, अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांची पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव, मुंबई येथील मुख्य प्रशासकीय अधिकारी या पदावर प्रथमत: एक वर्षासाठी खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे.

अ) श्री. निवृत्ती भागुजी मराळे, अवर सचिव ज्या तारखेला प्रतिनियुक्तीच्या पदावर रूजू होतील त्या तारखेपासून प्रतिनियुक्तीच्या सेवेचा प्रारंभ होईल आणि ती सेवा ज्या तारखेला तो आपल्या शासकीय पदाचा कार्यभार पुन्हा स्विकारील त्या तारखेला समाप्त होईल.

ब) जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने शासनाला आवश्यक वाटली तर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्यांना परत बोलावून घेण्याचा अधिकार शासन/सक्षम प्राधिकाऱ्यास राहील.

क) जर त्यांची सेवा स्वीयेतर नियोक्त्याला आवश्यक वाटली नाही तर त्यांना मूळ विभागाकडे परत पाठविण्याची मुभा स्वीयेतर नियोक्त्याला राहील. मात्र याप्रमाणे परत पाठविण्यापूर्वी स्वीयेतर नियोक्त्याने शासनाला/सक्षम प्राधिकाऱ्याला तीन महिन्यांची नोटीस दिली पाहिजे; आणि

ड) त्यांनी मूळ विभागाकडे परत जाण्याचा आपला उद्देश आहे अशी कमीत कमी तीन महिन्यांची लेखी नोटीस शासनाला / सक्षम प्राधिकाऱ्याला दिल्यानंतर त्यांना मूळ विभागाकडे परत येण्याची मुभा राहील.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा... इ.) नियम १९८१ मधील नियम ४० (परिशिष्ट दोन) मधील तरतुदी विचारात घेऊन पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने प्रतिनियुक्तीबाबतच्या अटी व शर्ती ठरवाव्यात.

३. श्री. निवृत्ती भागुजी मराळे, अवर सचिव यांच्या इतर सर्व प्रशासकीय बाबी उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत हाताळण्यात येतील.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१०९१६०२१६५४०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration, postalCode=400032, st=Andhra Pradesh, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2018.01.09 16:05:43 +05'30'

(ग.भि.गुरव)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,

२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. अ.मु.स.(सेवा),सा.प्र.वि., मंत्रालय, मुंबई,
४. अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग / पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय,मुंबई,
५. सह सचिव/उप सचिव (आस्थापना), उच्च व तंत्र शिक्षण विभाग / पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय,मुंबई,
६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई
७. श्री. निवृत्ती भागुजी मराळे, अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
८. निवडनस्ती कार्यासन-१४